८२

वंदे मातरम्।

शाहिरी............डफ

# पोवाडा ७ वा

संग्रामदेवता

# महाराणी लक्ष्मीबाईचा

# पोवाडा

लेखक—प्रल्हादराय.

(मूल्य ४ आणे)

# निवेदन

आजपर्यंत महाराणी लक्ष्मीबाईंचेवर बरेच पोवाडे झाले आहेत व पुढेंही होतील. परंतु प्रस्तुतचा पोवाडा मला महाराष्ट्रशाहीर श्री. दु. आ तिवारी यांच्या सूचनेवरून तयार करावा लागत आहे. सदरच्या पोवाडयांत त्यांच्याच संग्रामदेवतेच्या पोवाडयांतील महत्त्वाचीं ओजस्वी वाक्यें घेतलीं आहेत. त्यांचे पोवाडे जुन्या चालींत आणण्याची कामगिरी मजकडे सोंपविली आहे; व त्याप्रमाणें मीं हा एक पोवाडा तयार केला असून यापुढें त्यांचीं संग्रामगीतांतील काव्यें हळुहळू जुन्या पोवाडयाच्या चालींत आणणार आहें. ही एवढी मोठी जबाबदारी त्यांनीं माझ्या सारख्या नवशिक्या शाहीराच्या अंगावर टाकून व ती पार पाडून घेण्याच्या बाबतींत प्रोत्साहन देऊन मला कायमचें उपकृत केलें आहे व ही जबाबदारी कशी काय पार पडते हें एक परमेश्वरास माहीत. परंतु जनता–जनार्दनाच्या पुढें हा अल्पसा प्रयत्न ठेवून त्याचे ज्या प्रमाणांत कोडकौतुक होईल त्याच प्रमाणांत मी पुढें पाऊल टाकण्याचें धाडस करीन.

प्रत्येक चौकाचा स्पष्ट बोध होण्याकरितां त्या त्या चौकांत येणाऱ्या कथानकाचा सारांश थोडक्यांत त्रोटक चरित्रापुढें देण्याचा उपक्रम केला आहे, त्यामुळें वाचकांस अर्थबोध फारच सुलभतेनें होईल अशी आशा आहे.

त्याचप्रमाणें माझे विनंतीस मान देऊन महाराष्ट्रशाहीर श्री. पां. द. खाडिलकर यांनीं प्रस्तावना लिहून दिली याबद्दल व श्री. तांबे यांनीं समग्र पोवाडा ऐकून आपलें स्पष्ट मत प्रदर्शित केलें याबद्दल मी उभयतांचा आभारी आहें.

जळगांव<br>
मिति गणेशचतुर्थी १८५५

सर्वांचा कृपाभिलाषी<br>
शाहीर.

# प्रस्तावना

जळगांवचे प्रसिद्ध शाहीर श्री. प्रल्हादराय जामखेडकर यांनीं स्वातंत्र्य-देवता महाराणी लक्ष्मीबाई यांचा पोवाडा लिहिला आहे. तो आज मीं समग्र वाचून पाहिला. या कथानकावर विविध प्रकारचें काव्य आणि पोवाडे यापूर्वींच थोडेबहुत निर्माण झालेले आहेत. परंतु ज्याप्रमाणें परमेश्वराचा गुणगौरव अनंतमुखानें केला तरी तो संपत नाहीं, त्याचप्रमाणें थोरामोठ्यांच्या चरित्राची गोष्ट आहे. व्यक्ति एकच पण पाहणाऱ्याच्या दृष्टीप्रमाणें ती विविध गुणांनीं विविध लेखकांना विविध प्रकारची दिसत असते.

सदर पोवाड्यामध्यें महाराणी लक्ष्मीबाई हिचें जें चरित्र रंगविलें आहे तें वाचून सहृदय माणसांना गहिंवरून आल्याशिवाय राहणार नाहीं. राज्य खालसा केल्यावर राणीची झालेली मनःस्थिति ही अत्यंत अनुरूप अशा शब्दांत 'यांत व्यक्त केलेली आहे. त्याचप्रमाणें लक्ष्मीबाईंनीं पेशव्यांना उद्देशून केलेलें चौथ्या चौकांतील भाषण हेंहीपण अत्यंत मनोरम साधलें आहे. भाषेची सजावट आरंभापासून शेवटपर्यंत अनुरूप झाली असल्यामुळें पोवाडा ऐकत असतां मनाला निःसंशय आल्हाद वाटत असतो. एकंदर हें काव्य प्रशंसनीय झालें आहे यांत शंका नाहीं.

श्रीयुत जामखेडकर या उदयोन्मुख शाहीरानें हा पोवाडा मला गाऊन दाखविला याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. अवघ्या वर्षसहा महिन्यांतच पोवाडा या विषयाचा नाद लागला असतांना या लक्ष्मीबाईच्या पोवाड्यासारखें काव्य त्यांच्या हातून बाहेर पडलें हें उदयोन्मुखतेचें लक्षण आहे. रसिकजन या काव्याचा योग्य परामर्ष घेतील अशी आशा व्यक्त करणारा

जळगांव
ता. १-११-३१.

पांडुरंग दत्तात्रय खाडिलकर एम्. ए.
शाहीर



# अभिप्राय

राणी लक्ष्मीबाई यांचे भाचे म्हणतात :

शाहीर प्रल्हादराय यांचा झांशीच्या संग्रामदेवतेवरील पोवाडा नवीन नमनासह आज मीं ऐकला. तो चांगला आवेशपूर्ण असून त्यांत बहुतेक सर्व इतिहास जितका आज उपलब्ध आहे तो यथास्थित आला आहे. त्यांचे इतर पोवाडेही असेच आवेशयुक्त व उत्साहपूर्ण असतील असें मला वाटतें. त्यांच्या यशाची वृद्धि सदोदित होत जावो अशी परमेश्वराजवळ मी प्रार्थना करितों.

जळगांव
ता. १३-९-३१.

गोविंद चिंतामण तांबे
बी. ए. एल्. एल्. बी.

( २ )

**हुतात्मा श्रद्धानंद**:— आश्विन कृष्ण १३, शके १८५३.

सिंहगडचा संग्राम (पोवाडा) व शाहीरी डफ थाप ४ थी (रचणार शाहीर प्रल्हादराय जामखेडकर जळगांव पू. खानदेश) हीं काव्यें शाहीरी थाटावर रचिलीं आहेत. सध्याच्या चळवळीचा प्रचार करण्याच्या उद्देशानें काढलेलीं आहे. शाहीराचा देशाभिमान कवनांत प्रत्ययास येतो.

( ३ )

महाराष्ट्र शाहीर श्री. **दु. आ. तिवारी** म्हणतातः—

श्री. जामखेडकर यांच्या ठायीं जुन्या तऱ्हेच्या पोवाड्यांची रचनाशक्ति आहे असें वाटल्यावरून त्यांस झांशीची संग्रामदेवता महाराणी लक्ष्मीबाई यांजवर एक पोवाडा लिहिण्याची सूचना केली होती. त्या सूचनेप्रमाणें त्यांनीं लिहिलेला राणीवरील हा पोवाडा मनोवेधक व चित्तरंजक आहे. 'पोवाडा ऐकावा तर तो शाहिराच्याच कंठांतून ऐकावा' हें जरी खरें तरी अलिकडे श्री. खाडिलकर, मुळे शाहीर वगैरेंनीं जुन्या पोवाड्याच्या चाली बऱ्याच लोकपरिचित केल्या आहेत. तेव्हां हा पोवाडा लोकादरास पात्र होईल अशी आशा आहे. ता. ५-४-३२.

**दु. आ. तिवारी.**

(४)

आपले छापलेले पोवाडे वाचले. पोवाडे चांगले असून लोकशिक्षणाचा व मनरंजनाचा आपला उद्देश सफळ करतील.

पुणें ता. २६।३।३३. यशवंत नरसिंह केळकर.

(५)

**ज्ञानप्रकाश**, पुणें. तारीख १९।५।१९३१

डफाची 'सुधारणा व देशस्थिति' या नांवाचा चवथा हप्ता शाहीर प्रल्हादराय जामखेडकर यांनीं लिहून प्रकाशित केला आहे. या हप्त्यांत मिशा काढण्याचा व स्वतः दाढी करण्याचा पडत चाललेला प्रचार, चहाचें व्यसन, सोवळ्याओंवळ्याचा सुटत चाललेला विधिनिषेध, विटाळचंडाळा-बद्दल बेफिकिरी, फंडगुंड देशभक्त व कज्जे दलाल, डॉक्टरांचा बेगडी धंदा, कुलस्त्रियांचा सुटत चाललेला विनय, प्रणय विवाहाचें येऊं पहाणारें संकट वगैरे प्रकरणांचा परामर्ष घेतला आहे. देशस्थिति या प्रकरणांत हल्लींची विद्या निकामी असल्यामुळेंच सर्वत्र अंदाधुंदी कशी माजत आहे याचें वर्णन दिलें आहे.

(६)

**केसरीः**– पुणें तारीख ८।४।३२

सिंहगडाचा संग्राम—(ले. प्रल्हादराय जामखेडकर जळगांव पू. खा.) तानाजीनें सिंहगड काबीज केला हा प्रसंगच इतका रोमहर्षण आहे कीं, त्यावर पुन्हःपुन्हाः काव्यें होत राहिलीं तरी त्याचा वीट येत नाहीं. प्रस्तुत पोवाडयाचें स्वारस्यहि हेंच. त्याचें भाषासौष्टव मनोरम असून वर्णनांत नावीन्य नसलें तरी तें चटकदार आहे. याच लेखकाच्या मुरारबाजीच्या पोवाडयाची दुसरी आवृत्ति निघाली असून 'देशस्थिति' व 'नमन' हे फुटकळ पोवाडेहि भाषेच्या दृष्टीनें बरे आहेत.

(७)

**महाराष्ट्रः**— नागपूर तारीख ४।१।१९३१

वीररत्न मुरारबाजी (ले. प्र. रं. जामखेडकर जळगांव) या पोवाडयांत मुरारबाजीच्या वीरचरित्राचें उब्दचित्र रेखाटलेलें आहे. पोवाडयाची भाषा जुनी असून त्यांत वीररसाचा चांगला उठाव झालेला आहे.





(८)

**प्रागतिकः**— जळगांव तारीख २२।६।३१

खानदेशांतील प्रसिद्ध शाहीर प्रल्हादराय यांनीं लिहिलेला 'सुधारणा व देशस्थिति' हा पोवाडा मोठा मनोरंजक व परिणामकारक झाला आहे. वाहवत चाललेल्या समाजाला या पोवाडयांत चांगले चिमटे घेतले आहेत. या पोवाडयास जोडूनच 'देशस्थिति व दारुबाजास इषारा' या दोन कविता चांगल्या आहेत. देशस्थिति या कवितेंत पूर्वीची व आजची तुलना केली आहे तीही बोधप्रद होईल.

(९)

**प्रबोधः**— धुळें तारीख १९।७।३१

शाहीर जामखेडकर जळगांव ह्यांचीं तीन पुस्तकें आमचेकडे आलीं आहेत. शाहीर यांचा बगीचा जरी नवा आहे तथापि पुष्पें ठीक आहेत.

(१०)

**प्रागतिकः**— **जळगांव** तारीख २४।८।३१. (सिंहगडचा संग्राम)

खानदेशांतील शाहीर प्रल्हादराय यांनीं हा पोवाडा केला असून तो फारच बहारीचा झाला आहे. या पोवाडयाची भाषा साधी, सर्वांस समजेल अशी असून वीरश्री उत्पन्न करणारी आहे. सदरहू पोवाडयांत तानाजीची प्रतिज्ञा, शेलारमामाची कामगिरी व इतर परिस्थितीचें वर्णन हुबेहुब केलें असून पोवाडा वाचतांना तें डोळ्यापुढें उभें राहतें.

(११)

**संत कवि दासगणु**

प्रल्हाद रंगनाथ जामखेडकर यास—तुमचे पोवाडे मी ऐकिले. रचना बरी आहे. कळावें हा आशिर्वाद ता. २३।९।३२.

---

# राणी लक्ष्मीबाईंचा अल्पपरिचय

१८५७ सालचे पूर्वीचा महाराणीचा थोडासा पूर्वेतिहास देणें वावगें होणार नाहीं. कारण प्रस्तुत पोवाड्यांत फक्त त्यांचे विरश्रीचाच भाग आला असून त्यांचे बालपणींची कांहींच हकीगत आली नाहीं म्हणून ती येथें थोडक्यांत देत आहें.

वांई क्षेत्रांत राहणारे तांबे उपनांवाचे कऱ्हाडे ब्राह्मण कृष्णराव हे पेशवाईंत मामलतीच्या जागेवर होते. त्यांच्या तीन मुलांपैकीं मोरोपंत हे एक होत. त्यांच्या पत्नी भागिरथीबाई या होत. या उभयतांचे पोटीं समरदेवता **महाराणी लक्ष्मीबाई** यांचा जन्म ता. १९–११–१८३५ रोजीं काशी क्षेत्रांत झाला. त्यांचे जन्मानंतर बालवयांतच त्यांच्या मातोश्रींनीं इहलोकची यात्रा संपविली. तेव्हां मोरोपंत ब्रह्मावर्तीं रावबाजीबरोबर राहिले होते. पेशव्यांचे चिरंजीव नानासाहेब तसेंच रावसाहेब हे राणीचे लहानपणचे सवंगडी होते. घोड्यावर बसणें, दांडपट्टा खेळणें, दौड मारणें वगैरे मर्दानी खेळांचें शिक्षण त्यांस अनायासेंच मिळालें. त्यांचें माहेरचें नांव मनूताई असें होतें. त्यांचे शौर्यादि गुण, स्वातंत्र्याची आवड वगैरेवरून त्यांचा मर्दानी बाणा दिसून येई. त्या रूपानें सुंदर होत्या. त्यांचे चहाते लोक त्यास कधीं कधीं 'छबेली' म्हणून हांक मारीत असत.

एकदां असा योग आला कीं, दसऱ्याचे स्वारीचे वेळीं तिचे संवगडी हत्तीचे अंबारींत बसून जावयास निघाले असतां त्यांस पाहतांच आपणांसही बसवावें म्हणून तिनें हट्ट धरला. तेव्हां मोरोपंतांनीं तिची पुष्कळ समजूत घालून त्रासानें म्हणाले तुझ्या नशिबीं हत्तीवर बसणें कोठून येणार? त्यावर त्या स्वाभिमानी रमणीनें कां? असें विचारिलें व **एक हत्ती सोडून शेंकडों हत्ती माझ्या नशिबीं आहेत** असें ती म्हणाली. तेव्हां तिच्या या उत्तरांचें कौतुक वाटलें पण तिची ही भविष्यवाणी खरी ठरली !

थोडे दिवसांत झांशीचे संस्थानिक श्रीमंत गंगाधरराव यांचेबरोबर त्यांचा विवाह होऊन १८४२ त मनुबाई ह्या **महाराणी लक्ष्मीबाई** झाल्या.

श्री. गंगाधरराव यांचे पोटीं पुत्रसंतान नसल्यामुळें मृत्यपूर्वी त्यांनीं दामोदरपंतास दत्तक घेतलें, व सन १८५३ सालीं त्यांचें देहावसान झालें. त्यानंतरची दत्तक प्रकरणाची हकिकत १ ल्या चौकांत आली आहेच. त्या नंतरच्या कालांत दत्तक मंजुरीचा प्रयत्न करण्याकरितां उमेशचंद्र बानरजी व एक इंग्रज गृहस्थ यांचेबरोबर बरीच मोठी रक्कम देऊन त्यांना इंग्लंडांत रवाना केलें असतां ते गेले ते पुन्हां परत आले नाहींत. या प्रकरणीं राणीसाहेबांचा खजिना जप्त करून घेतला, फौजफाटा मोडला, तोफा फोडल्या व राणीसाहेबांस दरमहा रु. ५००० ची नक्त नेमणूक ( पेन्शन ) ठरविली पण त्या स्वाभिमानी राणीनें तें स्वीकारिलें नाहीं.

यानंतर राणी लक्ष्मीबाईची दिनचर्या म्हणजे सदैव तिन्ही त्रिकाळ स्नान करणें, ईश्वरपूजा, पुराणश्रवण, भेटी वगैरे कार्यक्रम असे. त्यांचें कुलदैवत महालक्ष्मी असल्यामुळें त्या शुक्रवारचें उपोषण करून त्या दिवशीं देवळांत देवीचे दर्शनास जात असत.

यापुढील हकीकत प्रस्तुतच्या **पोवाड्यांत** आली आहे.

## पहिल्या चौकांतील कथानक

या चौकांत १८५७ सालाचे पूर्वीचा थोडासा इतिहास वर्णन केला आहे. तहनाम्याप्रमाणें डलहौसीसाहेब वागले नाहींत, याचें कारण असें कीं, श्री. राजे गंगाधरराव हे कालवश होण्याचे पूर्वी त्यांनीं एका मुलास दत्तक घेतलें आणि त्या वेळचे पो. एजंट एलीससाहेब यांना असें सांगितलें कीं, झांशीचे तक्ताचें आपण रक्षण करावें. परंतु डलहौसी साहेबांनीं आपली पूर्वपुण्याई खर्च करून झांशीचें राज्य खालसा केलें. त्यावेळीं महाराणी लक्ष्मीबाईस अत्यंत त्वेष येऊन त्या बोलल्या कीं **नही देऊंगी मै झांशी.**

## दुसऱ्या चौकांतील कथानक

१८५७ पर्यंत **महाराणी** अत्यंत दुःखानें काळ कंठीत होत्या व त्याच सुमारास श्री. नानासाहेब पेशवे, तात्या टोपे वगैरे मंडळी गेलेलें स्वातंत्र्य पुन्हां मिळविण्याच्या खटपटींत होते. या स्वातंत्र्ययुद्धांत महाराणी लक्ष्मीबाईंनीं पुढाकार घेऊन त्या युद्धांत सामील झाल्या व ठरलेल्या वेळीं त्यांनीं स्वातंत्र्याचें निशाण उभारून युद्धास सुरुवात केली. त्यांचे साह्यार्थ तात्या टोपे वीस



हजार सेना घेऊन दाखल झाले. परंतु त्यांचे उलटे गतीमुळें अथवा व्यवस्थेशीर पिछेहाटीमुळें महाराणीस शत्रुसैन्याशीं एकटेंच झुंजावें लागलें. असें असतांही त्या वीर रमणीनें इंग्रजी सेनानी डीक, स्टुअर्ट, बोनस फॉक्स, मिक्लीजान वगैरे लोकांस लोळविलें.

## तिसऱ्या चौकांतील कथानक

याप्रमाणें झांशींत युद्धाची सारखी १० दिवस धुमश्चक्री चालू असतां देशद्रोह्यांनीं फितुर होऊन मारगिरीच्या जागा दाखविल्या. नंतर शत्रुसैन्यानें मोर्चे बांधून तोफा डागण्यास सुरवात केली. त्यायोगानें दारूगोळा जळून गेला होताच. पण या मारगिरीमुळें गणेश आणि विलास महाल अग्निनारायणाचे भक्ष्यस्थानीं पडले. अशा तऱ्हेनें युद्ध ऐन रंगांत आलें असतां राणीसाहेब मागेंमागें सरकत जाऊन किल्ल्यांत कोंडल्या गेल्यावर त्यांनीं त्या ठिकाणाहून उत्तम गोलंदाजाकडून घनगर्ज, कडकबिजलीनामक व इतर कित्येक तोफांचा मारा केला, तोफांची सरबत्ती सारखी चालूच होती, पण दैव अनुकूल नसल्यामुळें मारगिरीचा उपयोग न होतां स्वसैन्यबल कमी पडत चाललें आणि त्यामुळें आपण शत्रुसैन्याचे हातीं कदाचित् सांपडूं म्हणून आपले दत्तकपुत्रास पाठीस बांधून व कांहीं विश्वासू लोक बरोबर घेऊन त्या किल्ल्याच्या तटावरून घोड्यासह उड्या मारून शत्रुसैन्यांतून निमिषार्धांत हां हां म्हणतां धूळ चारून निघून गेल्या व पाठलागाकरितां बौकर मागें लागला असतां त्यासही जखमी करून त्या एका दिवसांत पेशव्यांचे गोटांत काल्पीस दाखल झाल्या. इकडे सर ह्यू रोजनें झांशी सर करून तेथें बीजन (म्हणजे जो कोणी अपराधी अगर निरपराधी मनुष्य दिसेल त्याला गोळी घालून ठार मारणें व लुटालूट करणें) सुरू करून 'मारिलें निरपराधी प्रजेला'

## चौथ्या चौकांतील कथानक

काल्पीस पोंचल्यावर राणीसाहेबास कालगतीमुळें अंगावरचे वस्त्राशिवाय दुसरें वस्त्रही नव्हतें. श्रीमंतास ही बातमी समजतांच त्यांनीं राणीचे इतमामाप्रमाणें त्यांचेकडे वस्त्रप्रावरणें वगैरे सरंजाम पाठविला. पेशव्यांचे भेटीस गेल्याबर त्यांनीं आपली विजयी तलवार श्रीमंतांपुढें ठेवून दिली. व त्यांस म्हणाल्या कीं, आपण आपला कारभार सांभाळून घ्यावा. श्रीछत्रपतीचे शिकवणुकीप्रमाणें मी रक्ताचे शाईनें इतिहासाची

कांहीं पानें लिहिलीं असून आपण माझे साहचार्थ धावून याल असें मला वाटलें होतें. असो. आपण मला या दगदगींतून मुक्त करावें व आपण आपलें पाहून घ्या, असें म्हणून त्यांनीं तलवार स्वाधीन केली. श्रीमंत गहिंवरून राणीस म्हणाले कीं, तुमचेशिवाय आतां आधार आम्हास दुसरे कोणाचा नाहीं. तरी ही आपली विजयी तलवार आपण सांभाळा आणि यापुढें आपणांस जें काय करणें असेल तें आपणच करा. इतक्यांत सर ह्यू रोज स्वसैन्यासह काल्पीस वेढा देऊन बसला. इकडेही युद्धाची तयारी होतीच. राणीनें तेथें अतुल शौर्य दाखवून शत्रुसैन्याची फळी फोडली आणि पेशव्या-सह ग्वाल्हेरीच्या मार्गास लागल्या. त्यावेळीं शत्रुसेनानी सर ह्यू रोज याचे मुखांतून आपोआप शब्द निघाले कीं, "योद्धा नाहीं मुळीं इचे तोडीला"

## पांचव्या चौकांतील कथानक

"जय लक्ष्मीबाई काल्पीस कल्पांत" करून जी निघाली ती थेट ग्वाल्हेरीच्या वेशीस धडकली. तत्पूर्वीच तात्या टोपे यांनीही तेथें शिंद्यांशीं झुंज सुरू केली होती. पण तात्यांना बालेघाटी चमू दाद देईना. इतक्यांत राणी तेथें येऊन पोंचली होतीच. तिनें बालेघाटयांचा बिमोड करून बाद्यांची (बुंदेल्यांचीं) दाणादाण करून "रमणीनेंच वीर पळविला."

## सहाव्या चौकांतील कथानक

जयाजीराव शिंदे पळून गेल्यावर त्यांनीं ग्वाल्हेर आपल्या ताब्यांत घेतलें आणि तेथें स्वातंत्र्याचें निशाण उभारलें. पेशव्यांनीं त्या समयीं अनेक विद्वान विप्र बोलावून आपणांस राज्याभिषेक करविला आणि शुभचिन्त-नार्थ ब्राम्हणभोजनें सुरू केलीं. या दंगलींत पेशवे असतांनाच सर ह्यू रोजनें ग्वाल्हेरीस वेढा देऊन मुरारीचे छावणीवर एकदम हल्ला चढविला व ती छावणी सर करून प्रतिज्ञा केली कीं, आज मी पेशव्यांचा गोट खास जिंकीन तोंच "संग्राम देवता लक्ष्मीबाई" तेथें शत्रुसैन्यास तोंड देऊन स्व-सैन्यास उत्तेजनार्थ म्हणाल्या कीं, "शिवरायाचें फेडावें थोडें तरी ऋण आज".

## सातव्या चौकांतील कथानक

वरीलप्रमाणें यशवंतीनें स्वसैन्यास उत्तेजन देऊन रणधुमाळी सुरू केली. प्रारंभीं सर ह्यू रोजनें एक पलटण सामन्याला पाठविली. ती सामन्यास



येतांच त्या खवळलेल्या सिंहिणीनें पलटणीस जागचे जागीं कापून काढलें. तोंच दुसरी तुकडी सामन्यास आली. तिचीहि तीच गत झाली. याप्रमाणें क्रम चालू असतां सर ह्यू रोजनें पायदळ आडोश्याला लपवून ठेवलें आणि हुर्जर्स नामक घोडेस्वारांचा रिसाला युद्धाकरितां पाठविला. युद्धाची धुम-श्चक्री चालू असतांना सैन्याचा धीर खचून तें सैरावैरा पळण्यास सुरुवात झाली. अशा स्थितींतही कांहीं नरवीरांनीं फाटलेल्या आभाळास ठिगळ देण्याचा प्रयत्न केला. तेव्हां जयलक्ष्मी मनांत उमजली कीं, ही आपली शेवटचीच संगरलीला आहे. याकरितां आपले कारभारी रामचंद्रबाबा यांस बोलावून त्या म्हणाल्या कीं मी जिवंतपणीं शत्रूच्या हातीं सांपडत नाहीं. पण मेल्यावरही वैऱ्याचा हात न लागावा. करितां युद्धांत कामास आलें तर माझा देह भस्मसात् करून टाकावा. असें सांगून शत्रुसैन्याचा वेढा तात्काळ फोडून त्या निघून गेल्यावर त्या पुढें व शत्रूचे घोडेस्वार मागें अशी शर्यत लागली असतां रस्त्यांतच सुंदरा नांवाची दासी कामास आली. यावेळीं त्या एका नाल्याजवळ येऊन पोंचल्या होत्या. याच जागीं त्यांचा नवीन घोडा नाल्याचें पाणी पाहून अडला (त्यांचा पूर्वीचा घोडा ग्वाल्हेरांत जखमी होऊन पडला होता). तो कांहीं केल्या नाला ओलांडून जाण्यास तयार होईना, तोंच घोडे-स्वारांनीं येऊन राणीस घेरलें. तेथें पुन्हां लढाईस प्रारंभ झाला. त्या एकट्या देवीवर चोहों बाजूंनीं शत्रू तुटून पडले असतां तिनें कित्येकांस लोळविलें. परंतु आयुर्मर्यादेपुढें इलाज नसल्यानें एका स्वारानें कीरचीचा वार मस्तका-वर मारतांच डावा डोळा फुटला तोंच थोडीशी विकल जाहली. इतक्यांत दुसरा वार त्यांचे छातीवर बसला असतां घोड्यावरून पडतां पडतां वार मारणाऱ्या शेवटच्या राहिलेल्या स्वारासहि त्यांनीं देहांत प्रायश्चित्त दिलें व त्या रणशय्येवर पहुडल्यावर आपल्या पुत्राचें शेवटीं मुखावलोकन करून पुन्हां एकवार कारभाऱ्यास प्रतिज्ञेचें स्मरण दिलें व देह धारातीर्थी ठेवला. (शेव-टचे वेळेस गंगाजलही त्यांचे भाग्यानें तेथें मिळालें आणि त्याच जागीं त्यांचा देह गवताचे गंजींत अग्निनारायणाचे स्वाधीन केला). व सर्व जगाच्या निदर्श-नास आणून दिलें कीं, वेळ आली असतां 'स्त्रियाही दाविती शौर्याला.'

जय हिंदमाता

शाहिरी—डफ

पोवाडा ७ वा

झांशीची संग्रामदेवता

# महाराणी लक्ष्मीबाईंचा पोवाडा

ले. प्रल्हादराय

धन्य लक्ष्मी देवी अवतार। भरत भूवर। दैत्य संहार। कराया हातीं धरिली तल्वार। शत्रुचें सैन्य मारले अनिवार। थरथरा कांपती आंग्ल सरदार॥ धृ०॥ जी जी जी

## चौक १ ला

चालः—अठराशेअठरां सालांत। फेकुन तागडयास। ग्रासि राज्यास। पेशवाईचें राज्य घेउनी हातांत। नऊ लाख पेन्शन देऊनी त्यास। बाजीराव ठेवला ब्रह्मावर्तास॥

चालः—कंपनीनें अम्मल बसविला, तोषविलें मग फितुऱ्यांना। सर्व जनासी तह करोनी काय बोलती राजांना॥ फौज सारी मोडून टाका रक्षूं तुमच्या राज्याना। हवा कशाला खर्च तुम्हांला, कंपनी तुमची गुलामना॥ गादी तमची चालवूं आम्ही, चिंता सारी सोडाना। उरले सारे मोडून टाकूं समान दर्जा सर्वांना॥ अभिवचनें ती, अमित देऊनी, कारस्थानें रची नाना। मराठेशाही, मोंगलशाही रसातळाला नेली ना॥

चालः–तह्नामे देशांत झाले फार। लिहिले भराभर। कपटी आचार। त्यांनीं नाहीं पाळल आपल्या वचनास । धुळीस मिळविलें कितीक राज्यांस। ऐकावा झांशीचा इतिहास ॥

चालः–श्रीमंतांना ताव भरला। बोलावून आणल एलीसाला । बोल्ला काय तवा साहेबाला । जीव घाबरला पहा जाण्याला । सामनें साक्षिस ठेऊन तुम्हाला। घेतलाय दत्त दामु अण्णाला। तुम्ही राखाव अमच्या गादिला। अहो औरस संतती नाहीं आमचे गादिला ॥

चालः–केला सांगावा रेसिडेन्टास। करा मान्य मम पुत्रास। चिंतेनें ग्रासल चित्तास। काय व्हईल त्या समयास ॥ चालः–निजधामा गेले गंगाधर। तक्ता धीश्वर। झाला अःकार। वारस होता त्यांचे गादीस। तोही नाहि आला त्यांचे मानांस। खर्चिल डलहौसी त्याच्या पुण्यास ॥

चालः–पाहून एकटया अबलेला। आंग्रजांनीं डाव टाकिला। अतांच घेऊं म्हणे झांशी राज्याला। त्यांची कारवाई गेली कळसाला। त्यान हुकूम केला त्या वक्ताला। उद्यांच भरवाव राज्यदरबाराला। देऊन एक वाडा तिला राहण्याला। अन्याय नितीचा खून करून-ध्यान घेती जिनगीला ॥

चालः–राजदरबाराचे दिवसास। बोलला बोली एलीस ॥ दत्तक मान्य नाहि कंपनीस। केल खालसा तुमच्या गादीस। आशेचा मनोरा समयास। कोसळून पडला खास ॥ देउंगी नही झांशीस। त्वेषानें बोलली त्यास ॥ चालः–काल व्हती राजलक्ष्मी सार्थ। आज नाम मात्र। विधीलेख विचित्र। एका दिवसांत रंक केल तिला। जंबुक गुहेमाजिं शिरला। सिंहीण डबचिली त्याच वक्ताला ॥

## चौक २ रा

स्वातंत्र्य परत घेण्याला। घेऊनि शस्त्राला। उभी लढण्याला। ऐकाव पुढें ठेवा अवधान। मर्दानी झांशीवाली भाग्यवान। भरतभूमाचा



तिला अभिमान ॥ क्रांतिची लाट उसळली। सत्तावन सालीं। कापाकापी केली। बिजलीसम तलवार घेऊनी हातांत। आली कालीभास होतो चित्तांत। राणी शिरकमलें उधळी गगनांत ॥

सर हुरोज युद्ध चतुर। गांव कुसावर। झाला बेजार। तीन आणविल तोफखान्यास। भक्षीतील वाटे तोफा सर्वास। बिनीवर राहिना कुणी लढण्यास ॥

चालः–देशद्रोह्यांनीं केला घात। किल्ल्यांत आणि नगरांत। दारूच्या कोठारावर। तोफांचा होतसे मार ॥ आणविल कडक बिजलीला गोषखान, खुदाबक्साला ॥

चालः–गरगंजाच्या बुरुजाला। ठेवलय तवाच कडक बिजलीला। तों वार धुम धडऽऽ झाला ॥ बारा सर्सा कर्नल मेला। पडघम बिगुल नादाला। शिंगें कर्णे देती जाबाला। तलवार आणि कामाला। पंढास देऊन चैतन्य चढविला हल्ला ॥ तात्या टोपे आले साह्याला। विस हजार होते दिमतीला। तों लगट झाली युद्धाला। विज चमकली गांव गोटाला। अपयश आलें तात्याबाला। दाविती उलटया गतिला। पण तिन सोडल नाहीं हिमतिला। उभी मर्दावाणी बांधुनि चंग युद्धाला ॥

चालः–पायजमा अंगरखा अंगीं। समशेर लटकली जंगी। रणदेवता किल्ल्यांतून आली। मर्दानी झांशीवाली ॥

चालः– गोरा दारावर धांवला। बावटा लावला त्यान तटाला। स्फुरण तें चढे तवा राणीला। मारि भिकली जान दैत्याला। वाघिणीन घेतल बोनस फॉक्सचे प्राणाला ॥ डिक स्टुअर्ट लोळविला। क्षणांत फिरे चहु बाजूला। काली तोडी नरमुंडाला। रक्तानें देह भरलेला। मुख्य तट हातामधुन गेला। नगराच्या फोडल येशीला। येऊन अरब सैन्याला। धुमाकूळ उडवूनि कापी रिपु सेनेला ॥

चालः–शत्रु लपती झाडाच्या मागें। कुणी लपती पडवीच्या मागें। लपुनी छपुनी करिती मार। बंदुकीची झडली फैर ॥ मर्दासी तुडवनी गेली। मर्दानी झांशीवाली ॥

चालः–समरस होऊनिया राणी । शिरे कापुनी । गेली रंगोनी । लागली स्वतंत्रतेची प्यास । म्हणूनच कापी शत्रुसैन्यास । अबला रक्षी झांशी राज्यास ॥

## चौक ३ रा

अंग्रजी गोलंदाजांनीं । मोर्चे बांधुनी । नेम साधुनी । नगरांत टाकिती गोळयाला । जागजागीं लाविती आगीला । गणेश आणि विलासमहाल पेटला ॥ इंद्राचें सिंहासन ढळलें । शेषही चळले । गर्भ गळले । ऐशी ती 'घनगर्ज' तोफ । पळामध्यें गोळे उडती अनेक । उडतांच तोंडची सुकली वाफ ॥

तिची होती खात्रीची तोफ । केली तिची फेक । गर्जली तोफ । जोंवर आहे तुझ्या दिमतीला । तोंवर देणार नाहीं झांशीला । पळवीन गोऱ्या सेनानिला ॥

सर ह्यूला नाहिं तें धैर्य । पळालें शौर्य । झाला गतवीर्य । जागेला राहिना मोर्चेवाला । दुर्बिण लावली त्यान पाहयला । त्याला धाडलय यमसदनाला ॥

चालः— राणीच्या गोलंदाजांनीं । शरसंधान केलें साधुनी ॥ पलटणी रकल्या मार्गें । राक्षसी माराच्या योगें ॥

चालः— तोफेच्या धुमधडाक्याला । वाटे धुमकेतु उगवला । रोमांच उठती अंगाला । कापर भरल कर चरणाला । निरमनुष्य मोर्चा केला । राणी ती ठेवी तोफांच्या तिथें सांगळयाला ॥

चालः— राजनिष्ठास ह्मणे मोह सोडा । फेकीन तटाहून घोडा ॥ देई बक्षीस कंठी तोडा । शिरपाव हत्ती, आणि घोडा ॥ चिलखत चढवी अंगाला । समशेर जंबिया भाला ॥ पाठीस बांधुन पुत्राला । कुरवाळून त्याचे मुखाला ॥ जणु बिजलीच चमकत गेली । मर्दांतुनि अबला गेली ॥

चालः—जागजागीं पहारेवाला । पाहे बाईच्या धैर्याला । होते चित्रापरी जागेला । तुडवीत गेली गोरा टोपीवाला । लेफ्टन बौकर मागें धावला । बाईच्या लागला तवा पाठिला । अंतर पडत चाल जागेला । पाहिना नदी आणि नाल्याला । आलि झांशीचे शिमेला । पाठीच सोडुन ठेवल पुत्राला ।





दोन घांस घाली बाळाला । तों शत्रु समिप पातला । एका वारान घायाळ केला । एका दिसांत लक्ष्मीराणी गेली काल्पीला ॥

चालः— झांशींत झाला अःकार । सूर्य असूनी झाला अंधार ॥ अंग्रज ह्मणती दयावंत । परि दया नाहि मनांत ॥ सूडाची सीम झाली । झांशीची केली होळी ॥ ती झांशी झाली हताश । धिःक्कार असो बिजनीस ॥

चालः–झांशीची केली बिजन । नाहिं अनुमान । झाले हैवान । मारिल निराप्राधी प्रजेला । तसेंचि स्त्रिया मुला बाळाला । काळीमा लागली त्यांचे तोंडाला ॥

## चौक ४ था

आपण आहांत दक्षिणेचे स्वामी । पेशवे नामी । येतां हरकामीं । सांभाळा आपुली ही तल्वार । माझ्याच्यानें कार्य नाहि होणार । जिवावर झाले होते उदार ॥ तुमचा होता मला आधार । नाहीं दरकार । पेशवे सरकार । मला होति तुमची बहु ती आस । धावून येतील या समयास । धरुनि झांशीचा अभिमान ॥ टोपे पळाले युद्ध सोडून । सैन्य घेऊन । धापा टाकून । पळालें सर्व सैन्य रानोमाळ । विपरीत भासे उलटा काळ । सांभाळा तुमचा सर्व जंजाळ ॥ मी हातिं धरिना तल्वार । अबला साचार । केला कारभार । पक्ष नाहि धरला कंपनीचा ॥ इतिहास लिहिला रुधिराचा । रक्षिला बाण छत्रपतीचा ॥

चालः— शिव सिंह असेल डोलला । पाहून झांशीचे युद्धाला । चिरकाल वरीन किर्तीला । डोळयांत आणून पाण्याला । पेशवे बोलति तवा बाईला । तुमचाच आधार आम्हाला । सांभाळा आतां ह्या अपल्या तल्वारिला ॥

चालः— काल्पीस करील कल्पांत । गोऱ्यास कापी हातोहात ॥ काल्पीस गोरे ते गेले । मराठयांस स्फुरण बहु आलें ॥ उसळून रक्त बाहून । समशेरीस घालिती हात ॥ रणभेरीचा होता नाद । 'हर हर महादेव' घोष ॥

चालः-- ठाई ठाई मोर्च्या बांधला । घोडदळ होतें सहाय्याला । सकलांनीं निश्चय केला । आज कापूं गोरा टोपिवाला । दिली सरबत्ती तोफेला । ती केवळ शौर्याची ज्वाला । कीं काळी जहरी अहिबाला । कां आली सिंहीण खायाला । चढे निश्चयवृत्ती जोमाला । अवरोध करी सूडाला । हल्ल्यावर चढविला हल्ला । योजूनि [illegible] संकलपाला । रोखल्या भयंकर तोफा । सकलास वदे कापा कापा? । शत्रुच्या अतुल शौर्याला । पायीं घातल तिनें खोडयाला । भूस्वर्ग करी ती एक त्याच वेळेला ॥ चालः-झांशीचा आतां घ्या सूड । शत्रुचा मोडावा मोड ॥ प्रिय भगिनी लढली यशार्थ । स्वातंत्र्यकाजीं यशार्थ ॥

चालः-जय किर्तीची ज्योत चेतली । ज्वाला भडकली । कला दाविली । योद्धा नाहीं मुळीं इचे तोडिला । शत्रु तोंडांत घाली बोटाला । मनांत म्हणे धन्य धन्य अबला ॥

## चौक ५ वा

सर ह्यू रोज सेनापतीचा । रिसाला उंटाचा । धावला साचा । आग वर्षत आला तोफखाना । मरण निश्चये निघाली युद्धाला । ती कल्पांत करिल काल्पीला ॥ महिषारि उत्साह देत । आति क्रोधांवत । कालिया डोहांत । श्रीकृष्ण नाचतो थयथया । निर्विष करुन सोडल कालियांला । तशिच गत केली गोऱ्या सैन्याला ॥ एकटया चंडिके वरती । भद्रिके भवती । धाऊनी जाती । जमले राक्षस चौहूं बाजूला । वळसे घेऊन जागजागेला । भारतभाग्यार्थ लढली काल्पीला ॥

चालः--पळविला वीर विदुलेनें । नाहली रिपुरुधिरानें ॥ ग्वाल्हेरीच्या त्या वेशींत । जयलक्ष्मी आली धांवत ॥ शिंद्यांना चढे मग लाली । शौर्याची सिमा झाली ॥ दिलजान सिकंदर गाजी । तोफास चढवी गोळयासी ॥

चालः-- टोप्याच्या मारगिरीला । कापला न हिंमतवाला । पण झांशीचे बाईला । थरथरा कापे जागेला । श्रीमंत होते दंगलिला । शिंद्यांचा जोर वाढला । हिंमतीचा दोर तुटला । तों समय देखुनि



बाला । उसळी मारून गेली युद्धाला । तिकडे जयशाली युद्धाला । इकडे दुर्दैवी अबला । तीन् हरवील प्रत्येक बालेघाटि मर्दाला ॥

चालः-- बांद्याचा फोडला बांद । उरला न मुळी चमुबंद ॥ शिंद्यास विजय आनंद । क्षणभरी नाचे स्वानंद ॥

चालः-राष्ट्राची स्फूर्ती लिलेनें । स्वयंस्फूर्तीनें । कापी खड्गानें । पळविला जयाजीराव शिंद्याला । यश मिळविल ग्वाल्हेरिला । रमणीनेंच जय मिळविला ॥

## चौक ६ वा

उफळून वाघीण गेली । नर्डि फोडिली । दया नाहिं केली । तीन हंसविला स्वर्ग गोल । अतुल शौर्याचे खेळली खेळ । राणी उडविल रणकल्लोळ ॥ शत्रुच्या भालीं राणीनें । भाल्या टोकानें । रिपुरुधिरानें । इतिहास लिहिला रुधिराचा । रणमर्द जयाजीरावांचा । उतरलाच नक्षा त्या वीराचा ॥ शिंदे निघाले युद्ध सोडून । पाठ दावून । गेले पळून । आश्रय धरला कंपनीचा । लोपला मर्दबाणा त्यांचा । सोडुन दिला अधार धनदौलतिचा ॥ जय होतां झाला आनंद । होऊनिया धुंद । सोडुन सारा बंद । म्हणविती चक्रवर्ती आपणास । राणी पाजि तें अमृत वचनास । पण बोल गेले वाऱ्यावर खास ॥ ह्यूरोज सैन्य घेऊन । आला धाऊन । वेढा देऊन । सामोरा राही तिथें युद्धास । म्हणे जिंकीन आज पेशव्यास । राणी तोंड देते चमू बांधास ॥ मुरारीच्या छावणीवर । धांवला सत्वर । आंग्ल नरवीर । एका झटक्यांत छावणी केली सर । मुरारिचीं सेना पळालि दूर । राणीला म्हणती धाव सत्वर ॥ लक्ष्मी म्हणे भरतभूमीचें । हिंदु तक्ताचें । शीवरायाचें । फेडावें थोडें तरी ऋण आज । म्हणा जय श्रीशिवाजी महाराज । फडकवा झेंडा शौर्याचा आज ॥

## चौक ७ वा

चंड मुंड दैत्य संहार । हरवी भूभार । हाती तल्वार । गदगदा हलविल भूगोलास । देवगण पाहती तिच्या युद्धास । आश्चर्यचकित करील सकलांस ॥ चौफेर शत्रु रिसाला । जागजागेला । रोखून तोफेला ।

ठेवलि नाहिं पळावयासी वाट । लाल रिसाले वाले आटोकाट । बंदुकीच्या फैरी झडती अचाट ॥ चपलेनें केली चपलाई । गमे नवलाई । कापी ठाईं ठाईं । येई जी तुकडी पुढें लढण्यास । हरविते राणी शत्रुचा माज । आणि पलटणी केल्या तिथें ठार ॥ आकाश आणि दिशा धुंद । तुटला चमुबंद । समरीं आनंद । सेनानी पळून जाती दुरदूर । म्हणती तरी वांचेल आपुला प्राण । कोण भरवसा तिचा धरणार ॥

चालः— राणी कापी शत्रु सैन्याला । पळविल कवायती फौजेला । लपविल दऱ्या खोऱ्याला । हुर्जर्स घोडे स्वाराला । पाठवल त्यान सामन्याला । प्रारंभ झाला युद्धाचा असा त्रेळेला ॥

चालः— यशवंती सावध जागेला । जाणिती त्यांचा काव्याला ॥ तोफांच्या धुमधडाक्यास । कित्येक उडाले गगनास ॥ बंदुकीच्या फैरी झाल्या । कित्येकांच्या छात्या फुटल्या ॥ शाबास तिचे धैर्यास । तिन सोडल नाहिं जागेस ॥ निघतांच तिच्या शब्दास । सैन्य गोल चढें जोमास ॥ त्याकाळीं लागली शर्थ । जयतर्क झाला अवितर्क ॥

चालः— मरणाची भिती समयाला । करी धारण युद्ध वेशाला मोत्याचा घोस कंठाला । डोळ्यांत सूड भारलेला । कमरबंद होता कसलेला । आवेश अंगीं भरलेला । ती आली ऐशा निकराला । उग्रकालीं आली खायाला । रक्तानें देह माखलेला । हटविल प्रत्येक मर्दाला । ह्यूरोज आला सामन्याला । पेशव्यांचा गोट जिंकला । मग कळून चुकल बाईला । ही ठरणार आपुली शेवटची संगरलीला ॥

चालः— हिंमत खचलि कैसा धीर । तेथें कोण करील मग स्थीर ॥ हंसलें तल्वारीस तकदीर । तोफा टाकून पळाले वीर ॥ वेढा फोडून गेली तात्काळ । ऊडवीत धुळीचा लोळ ॥ हां हां वदवितसे सकलांस । भूस्पर्श दिसेना कवणास ॥

चालः— तीनें डचकीवल काळाला । आली सुंदर दासी कामाला । स्वर्गांत गेली सांगाया । त्या राणीचे शौर्याला । अडला घोडा बघा नाल्याला । घोडा उचलिना पायाला । स्वारांनीं घेरल बाईला । एकेक स्वार कापला । तों वार मस्तकीं आला । डावा डोळा सोडी जागेला



किर्चीं भेदून गेली छातीला । आशेन सोडल बाईला । पण तिनें ठार केला शत्रुला । राहिलेला गोरा कांपला । मग कोंसळी बाई धरणीला । शेवटच पाहयल पुत्राला । राणी म्हणे रामचंद्र बाबांना । जातो जीव राखा पोराला । शिवू नका देऊं माझे देहाला । म्लेच्छांचा इटाळ होईल मला ! येथेंच जाळावें मला । अस म्हणून प्राण सोडिला । गवताची चिता मंग तिला । तेथेंच जाळल राणीला । जन अजुन दावती जागेला । मर्दानीचें रण सेजेला । परी तीच स्फूर्ति देऊन देवो शौर्याला ॥

चालः— काव्य कला निपुण तिवारी यांचे आज्ञेन ॥ ही जडली हिऱ्याची जडण शाहीरान ॥ रंगनाथ सिताबाई यांचे पोटीं जनन ॥ शाहीराच नांव ठेविल त्यांनीं प्रल्हाद ॥ देशस्थ असुनि तो ऋग्वेदी ब्राह्मण ॥ गंगेच्या तीरावर आहे त्याच ठिकाण ॥ नासिक क्षेत्र तें पावन केल रामान ॥ रहिवाशी असे तो त्याच क्षेत्राचा जाण ॥ अठराश त्रेपन्न शकांत केल कवन ॥

चालः—तेजस्वी हिरकणी गेली । जोत मावळली । अशा संपली । स्त्रियाही दाविती शौर्याला । स्वराज्य रक्षणीं देऊन प्राणाला । लाजवि मर्दाला । सवाल तुम्हांला । शाहिरान केला ॥

## संपूर्ण